# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Shyam Khandare
Director
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 318 /2022 Dt : 07/12/2022

प्रति,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/रासेयो कार्यक्रम अधिकारी,
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

विषय:— उत्कर्ष २०२२—२३ राज्यस्तरीय सामाजीक सांस्कृतीक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरीता विद्यापीठाची चमु निवडीकरीता दिनांक १८/१२/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता गोंडवाना विद्यापीठ सभागृहात निवड चाचणीमध्ये सहभाग घेण्यास विद्यार्थांना पाठविण्याबाबत.

संदर्भ:— रासेयो—२०२२/प्र.क्र १११/साशी—७, दिनांक २९ नोव्हेंबर २०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपनास कळविण्यात येते कि, उत्कर्ष २०२२—२३ राज्यस्तरीय सामाजीक सांस्कृतीक स्पर्धा दिनांक ०२ जानेवारी ते ०५ जानेवारी २०२३ या कालावधीत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापुर विद्यापीठ, सोलापुर येथे आयोजीत करण्यात येत आहे. सदर स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी विद्यापीठ चमुची निवड करावयाची आहे. या मध्ये ०९ मुले ०९ मुली व ०१ कार्यक्रम अधिकारी (संघनायक) अशी विद्यापीठ संघाची निवड करावयाची आहे. या करीता दिनांक १८/१२/२०२२ रोज रविवारला सकाळी १०.०० वाजता विद्यापीठ सभागृहामध्ये विद्यापीठस्तरीय निवड चाचणी शिबीर आयोजीत करण्यात आलेले आहे.

करीता आपल्या महाविद्यालयातील स्वंयसेवक व स्वंयसेविका यांना निवड चाचणी मध्ये सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहीत करुन दिनांक १४/१२/२०२२ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत सहभाग करीता प्रस्ताव सादर करावे अन्यथा निवड चाचणीमध्ये सहभाग करुन घेतल्या जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी. (सदर प्रस्ताव मध्ये रासेयो स्वंयसेवकांची संपर्ण माहीती, रासेयो कार्यक्रमात सहभागी प्रमाणपत्र, रासेयो विभागाच्या सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये जसे संकल्पना नृत्य, पथनाटय, लोकवाद्य, ललितकला, छायाचित्रण, साहीत्य मध्ये सहभागीचे प्रमाणपत्र संलग्न करुन प्रस्ताव तयार करुन सादर करावे) व दिनांक १८/१२/२०२२ रोज रविवारला सकाळी १० वाजेपर्यंत निवड चाचणी करीता विद्यापीठ सभागृहामध्ये उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात यावे. निवड चाचणी दरम्यान सहभागी विद्यार्थांचा प्रवासखर्च रासेयो नियमित कार्यक्रम अनुदानातुन करावा.

धन्यवाद!

07/12/22
डॉ. श्याम खंडारे
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र : नियमावली.

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com
दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५.

क्रमांक: रासेयो-२०२२/प्र.क्र.१११/साशि-७
दिनांक: २९ नोव्हेंबर, २०२२

प्रति,
कार्यक्रम समन्वयक,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर -४१३२५५

विषय : सन २०२२-२३ मधील वर्षात "उत्कर्ष" सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्याबाबत

संदर्भ: आपले पत्र क्रमांक जा.क्र.पुअहोसोविसो/आस्था/२०२२/९०३० दि. २१.११.२०२२
व पत्र क्रमांक जा.क्र.पुअहोसोविसो/रा.से.यो./२०२२-२३/९१२८ दि. २५.११.२०२२

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सन २०२२-२३ मधील "उत्कर्ष" सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव आपल्या विद्यापीठामध्ये दि. ०२ जानेवारी, २०२३ ते दि. ०५ जानेवारी, २०२३ या कालावधीमधे राबविण्यास शासनाच्या वतीने परवानगी देण्यात येत आहे.

उत्कर्ष नियमावलीनुसार संघाच्या परिपूर्ततेची पूर्तता करण्याची जबाबदारी कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांची असेल याची नोद घ्यावी.

30.11.2022

( डॉ. प्रशांतकुमार वनंजे )
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन

राष्ट्रीय सेवा योजना कक्ष उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक उत्कर्ष स्पर्धा, सहभागी संघ २०२२-२३

| अ.क्र. | विद्यापीठ | कार्यक्रम अधिकारी | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | १ | ९ | ९ | १९ |
| २ | कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, जि. नागपूर | १ | ९ | ९ | १९ |
| ३ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | १ | ९ | ९ | १९ |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे जि, रायगड | १ | ९ | ९ | १९ |
| ५ | डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | १ | ९ | ९ | १९ |
| ६ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | १ | ९ | ९ | १९ |
| ७ | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | १ | ९ | ९ | १९ |
| ८ | भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे | १ | ९ | ९ | १९ |
| ९ | स्वामी रामानंद तीर्थ, मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | १ | ९ | ९ | १९ |
| १० | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ | ९ | ९ | १९ |
| ११ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | १ | ९ | ९ | १९ |
| १२ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | १ | ९ | ९ | १९ |
| १३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १ | ९ | ९ | १९ |
| १४ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | १ | ९ | ९ | १९ |
| १५ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | १ | ९ | ९ | १९ |
| १६ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई | १ | ० | १८ | १९ |
| १७ | एच. एस. एन. सी. विद्यापीठ, मुंबई | १ | ९ | ९ | १९ |
| एकुण | | १७ | १४४ | १६२ | ३२३ |

राष्ट्रीय सेवा योजना कक्ष उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक

उत्कर्ष स्पर्धा २०२२-२३

नियमावली:-

१. प्रत्येक विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेतंर्गत उत्कृष्ठ स्वयंसेवकांची निवड चाचणी व्दारे संघ तयार करतील.
२. संघ संख्या १९ असेल, त्यात ९ स्वयंसेवक व ९ स्वयंसेविका व १ कार्यक्रम अधिकारी यांचा समावेश असेल.
३. सहभागी संघास राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे माहित असावीत.
४. संघातील प्रत्येक स्वयंसेवक राष्ट्रीय सेवा योजनेतंर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक राहील व त्याचे वय स्पर्धेदरम्यान २५ वर्षे पूर्ण नसावे, तसेच १० वी बोर्ड सर्टिफिकेट प्रवेशिके सोबत जोडणे आवश्यक आहे.
५. संघ पात्रतेची पूर्ण जबाबदारी संबंधीत कार्यक्रम समन्वयक यांच्यावर राहील.
६. सहभागी संघ आरोग्यदृष्टया सक्षम असेल याची खात्री करावी व सोबत डॉक्टरांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र असावे.
७. सहभागी संघातील प्रत्येक स्पर्धकास पालक व तसेच प्राचार्यांच्या सही शिक्क्यासह सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे संमतीपत्र जोडणे बंधनकारक राहील.
८. परीक्षकांनी दिलेले निर्णय सर्वांना बंधनकारक राहतील.
९. स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश मुल्य आकारले जाणार नाही.
१०. सहभागी स्पर्धकांचा प्रवासखर्च विद्यापीठाने / महाविद्यालयाने प्रशासकीय खर्चातून करावा.
११. प्रत्येक स्पर्धकांचे महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत असावे.
१२. राष्ट्रीय स्तरावरील सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होणा-या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभगी होऊ नये.
१३. ही स्पर्धा फक्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसाठी असेल.

उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा सहा विभागात घेतली जाईल.

१) नृत्य: (DANCE)

संकल्पना नृत्य: (CREATIVE DANCE)

१. यामध्ये एका कलाकाराचा सहभाग असेल व कलाकृती सादर करताना ३ साथीदार सोबत असतील.
२. सहभागी कलाकार नृत्यातून आविष्कार सादर करेल. इतर साथीदार संगीत, संवाद व गाणे या माध्यमातून त्याला साथ देतील.
३. नृत्याचा कालावधी जास्तीत जास्त ७ मिनीटे असेल व ५ मिनिटानंतर सूचक घंटा वाजविली जाईल. (सादरीकरणासाठी किमान वेळ ५ मिनिटे असेल.)
४. संकल्पना नृत्याच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या संकल्पनेवर आधारित विषयाचा संदेश प्राप्त होणे अपेक्षित आहे.

२) नाटय: (THEATRE)

पथनाटय:

१. नाटय प्रकारात पथनाटय सादर केले जाईल.
२. पथनाटयामध्ये ४ ते ९ स्पर्धक भाग घेतील व त्यात साथीदार समाविष्ट असतील.
३. पथनाटयाचा कालावधी १० मिनीटे असेल व ८ मिनिटानंतर सूचक घंटा वाजविण्यात येईल.
४. पथनाटयामध्ये संहिता स्वयंसेवकांनी लिहिलेली असल्यास त्यास विशेष प्राधान्य दिले जाईल.
५. पथनाटयामध्ये लेखी संहित, संगीत, संवाद, दिग्दर्शकाचे नावे स्पर्धेपूर्वी आयोजक विद्यापीठास सादर करणे बंधनकारक राहील.
६. या प्रकारात ध्वनीक्षेपनाचा वापर अपेक्षित नाही.

३) संगीत: (MUSIC)

(अ) (समुहगीत)

१. संगीत विभागात समूहगीत सादर केले जाईल.
२. या स्पर्धेत ६ कलाकार सहभाग घेतील व ३ साथीदार साथ देतील.
३. समूहगीत सादरीकरणाचा कालावधी १० मिनिटे असेल व त्यात सलग २ गीत सादर करणे अपेक्षित आहे.
४. त्यात १ लोकगीत (Folk Song) व दुसरे देशभक्तीपर (Patriotic) गीत असेल.
५. चित्रपटात सादर झालेले गीत स्पर्धेकरिता निवड नये.
६. समूहगीत मराठी किंवा हिंदी भाषेत सादर करावे.

(ब)भारतीय लोक वाद्य:

१. स्पर्धेत एका विद्यापीठाचा एक स्पर्धक भाग घेवू शकेल.

२.रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ.पूर्व तयारीसाठी २ मिनिटे दिली जाईल.

३.संगीत साथीदारांची संख्या जास्तीत जास्त दोन असावी.

४.सिनेगीतांना या कला प्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.

५.सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.

६.सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिली जातील व ८ मिनिटानंतर सूचक घंटा होईल.

(क)भारतीय लोककला- पोवाडा, भारूड, भजन इत्यादी.

१.सदर स्पर्धा प्रकारात महाराष्ट्रातील लोककला परंपरेच्या माध्यमातून विविध विषयांवर समाज जागृती करण्यासाठी वापरण्यात येणा-या विविध लोककला सादर करणे अपेक्षित आहे. उदा.पोवाडा, भारूड, भजन, ओव्या इत्यादी.

२. सदर स्पर्धेत १ स्पर्धक (मुलगा / मुलगी) भाग घेतील.

३. स्पर्धेचा कालावधी ५ मिनिटाचा असेल.

४. सदर स्पर्धेसाठी स्पर्धकास दोन साथीदार / सहाय्यकांचा वापर करता येईल.

४) ललितकला (FINE ARTS)

भित्तीचित्र (POSTER COMPETITION) घोषवाक्यासह (SLOGAN)

१. सदर स्पर्धेत २ स्पर्धक (१ मुलगा १ मुलगी) सहभाग घेतील. म्हणजेच प्रत्येक विद्यापीठाच्या २ प्रवेशिका असतील.
२. स्पर्धेचा कालावधी अडीच तास असेल.
३. स्पर्धेस लागणारा कागद आयोजक विद्यापीठ उपलब्ध करेल, परंतु इतर साहित्य (उदा. रंग, ब्रश इ.) स्पर्धक व संबंधित विद्यापीठाने आणावयाचे आहे.
४. स्पर्धेचा विषय स्पर्धा सुरू करताना दिला जाईल.
५. भित्तीचित्राच्या मागील बाजूस स्पर्धकाचे नांव, विषय व विद्यापीठाचा कोड क्रमांक नमूद करावा.
६. भित्तीचित्रात समर्पक घोषवाक्याचा समावेश असावा.

५)साहित्य: (LITERATURE)

(अ) निबंध:

१. निबंध स्पर्धेत दोन स्पर्धक त्यात १ मुलगा व १ मुलगी सहभागी होणे बंधनकारक राहील.

२. स्पर्धेचा कालावधी २ तास असेल.

३.निबंधाचे २ विषय संघप्रमुखाच्या बैठकीत पहिल्या दिवशी दिले जातील.

४.प्रत्येक संघाने २ स्पर्धकाची तयारी करून एकेकाने एका विषयावर स्पर्धेच्या दिवशी व नियोजित वेळी निबंध लिहावयाचा आहे.

५.निबंधाचे माध्यम मराठी, इंग्रजी व हिंदी असेल.

(ब) वक्तृत्व स्पर्धा:

१. वक्तृत्व स्पर्धेत १ स्पर्धक (मुलगा किंवा मुलगी) सहभागी होणे बंधनकारक राहील.

२. सहभागी स्पर्धकास सादरीकरणासाठी ५ मिनिटांचा कालावधी असेल व ३ मिनिटानंतर सूचक घंटा होईल.

३. स्पर्धेचे विषय संघ प्रमुखाच्या बैठकीत पहिल्या दिवशी जाहीर केला जाईल.

४. स्पर्धेदरम्यान जाहीर केलेल्या विषयावरील ठळक मुद्दे लेखी स्वरूपात पंचांना सादर करणे बंधनकारक राहील.

(क) कविता:

१. स्पर्धेत दोन स्पर्धक त्यात १ मुलगा व १ मुलगी सहभगी होणे बंधनकारक राहील.

२. प्रत्येक संघाने २ स्पर्धकाची तयारी करून एकेकानी एका विषयावर स्पर्धेच्या दिवशी व नियोजित वेळी कविता सादर आहे.

३. निबंधाचे माध्यम मराठी व हिंदी असेल.

४. सहभागी स्पर्धकास सादरीकरणासाठी ५ मिनिटांचा कालावधी असेल व ३ मिनिटानंतर सूचनक घंटा होईल.

५. कवितेमध्ये नवीन आशयाचा संदेश असावा.

६) छायाचित्रण स्पर्धा (PHOTOGRAPHY)

१. प्रत्येक सहभागी संघाने स्पर्धेच्या उद्घाटनापासून ते स्पर्धा संपेपर्यंतच्या कालावधीतील छायाचित्रे काढावीत.

२. त्यातून उत्कृष्ठ १५ छायाचित्रे लघुमुद्रिक (सी.डी.)स्वरूपात सादर करावयाची आहे.

३. स्पर्धेसाठी लागणारा डिजीटल कॅमेरा सहभगी विद्यापीठाने आणावयाचा आहे.

४. संगणक व संबंधीत सामुग्रीची व्यवस्था आयोजन विद्यापीठ करेल.

७) पथसंचलन:

पथसंचलन हे उद्घाटन सोहळयापूर्वी संपन्न होणे अपेक्षित आहे. उत्कर्ष ही स्पर्धा सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा असल्यामुळे सामाजिक समस्येवर आधारित रासेयो उपक्रमातील संबंधित संकल्पना देण्यात येईल. दिलेल्या विषयावर विविध प्रकारे वेशभुषा, रंगसंगती, चलचित्र, घोषवाक्य इ. माध्यमांचा वापर व्हावा. या पथसंचलन सुरूवातीला विद्यापीठाचा बॅनर असावा व त्या पाठोपाठ पथसंचलनाचा चमू असावा. विद्यापीठ अंतर्गत सहभागी सर्व स्पर्धक पथ संचलनात भाग घेणे अपेक्षित आहे. पथ संचलनाच्या गुणांचा सर्वसाधारण विजेते पद घोषित करताना विचार केला जाणार नाही. नाविण्यपूर्ण, उत्कृष्ठ पथ संचलन चमूस फिरता चषक देण्यात येईल.

८) उत्कर्ष कार्यप्रसिध्दी अहवाल/स्पर्धा-(प्लेक्स बॅनर):

२ जानेवारी ते ५ जानेवारी या सप्ताहामध्ये विद्यापीठाने आयोजित केलेलया विविध उपक्रमांवर आधारित अहवाल तयार करणे अपेक्षित असून, तो अहवाल या स्पर्धेसाठी अपेक्षित आहे आणि या अहवालावर परिक्षकांमार्फत

गुण तक्ता तयार करून सर्वोत्कृष्ट कार्य प्रसिध्दी अहवालास पुरस्कार दिला जातो. या गुणांचा सर्वसाधारण विजेत्या पदासाठी विचार केला जाणार नाही.

१. या स्पर्धेत सहभागी विद्यापीठांनी १ x १ मीटर या आकाराच्या प्लेक्स भिंतीचित्र बनविणे अपेक्षित आहे.
२. या स्पर्धेसाठी प्रत्येक विद्यापीठांनी २ प्लेक्स आणणे अपेक्षित आहे.

प्रमाणपत्रे व पारितोषिके:

१. प्रत्येक विभागातील स्पर्धेस अनुसरून प्रथम ३ उत्कृष्ट विजेत्यांना पारितोषिके दिले जातील.
२. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.
३. स्पर्धेत प्रत्येक विभागात फिरता चषक, तसेच सर्वोत्कृष्ट संघास फिरता चषक देण्यात येईल.

संपर्क आणि स्पर्धा स्थळ:

स्थळ: राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

संपर्क: डॉ. केदारनाथ काळवणे कार्यक्रम समन्वयक तथा संचालक, विद्यार्थी विकास, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

भ्रमणध्वनी- ७०२०६३४५०२ कार्यालय: दूरध्वनी

फॅक्स: ई-मेल: nss@sus.ac.in

| | | |
|---|---|---|
| स्पर्धा दिनांक | : | दिनांक- ०२ जानेवारी ते ०५ जानेवारी २०२३ |
| आगमन | : | दिनांक - ०२ जानेवारी (दुपारी ०२:०० वाजेपर्यंत) |
| प्रस्थान | : | दिनांक- ०५ जानेवारी (संध्याकाळ ०४:०० वा. नंतर) |

उत्कर्ष प्रवेशिका

विद्यापीठाचे नाव:

पत्ता:

दूरध्वनी क्रमांक: फॅक्स

संघप्रमुखाचे नाव:

भ्रमणध्वनी:

| अ.क्र. | स्पर्धकांची नावे | वर्ग | महाविद्यालयाचे नावे | जन्मतारीख |
|---|---|---|---|---|
| मुले | | | | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| मुली | | | | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

विद्यापीठ-

विद्यापीठाचे नाव:

प्रवेशिका

उत्कर्ष- प्रवेशिका स्विकारण्याची अंतीम तारीख:

| अ.क्र. | स्पर्धा | स्पर्धा प्रकार | सहभागी संख्या | साक्षीदार संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | नृत्य | संकल्पना नृत्य | | |
| २ | नाटय | पथनाटय | | |
| ३ | संगीत | अ)समुहगीत<br>ब)भारतीय लोकवाद्य<br>क)भारतीय लोककला | | |
| ४ | ललितकला | भित्तीचित्र व घोषवाक्य | | |
| ५ | साहित्य | अ)निबंध<br>ब)वकृत्व<br>क)कविता | | |
| ६ | छायाचित्रण | छायाचित्रण | | |

(टिप: प्रत्येक विद्यापीठाच्या संघाची एकूण स्पर्धकांची संख्या १९ असेल व साथीदार त्यात समाविष्ट असतील.)

## प्रतिज्ञापत्र

मी खाली सही करणार की, श्री/श्रीमती/कु. असे नमुद करतो/करते की, मी विद्यापीठाच्या स्पर्धासाठी प्रवेशिका दाखल केली आहे. उपरोक्त प्रवेशिकेमध्ये नमूद केलेली सर्व माहिती सत्य आणि वास्तव्य आहे. अशी मी हमी देत आहे. यामध्ये कोणतीही असत्यता आढळल्यास किंवा सिध्द झाल्यास सदर स्पर्धेसाठी संघ अपात्र ठरविण्यात येईल. याची मला पूर्ण जाणीव आहे.

तसेच पुढे मी असेही नमूद करतो/करते की, उपरोक्त स्पर्धेच्या सर्व नियम व अटी मी वाचलेल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक राहतील. शिवाय राज्य संपर्क अधिकारी / आयोजन समितीने दिलेला निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील. याची देखील मला पूर्ण जाणीव आहे.

सदर स्पर्धेत सहभागी होणारे सर्व १९ स्वयंसेवक हे २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय / विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना एककातील नोंदणीकृत स्वयंसेवक आहेत. सोबत प्रत्येकाचे स्वयंसेवक नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले आहे.

नांव व सही दिनांक:

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक<br>
राष्ट्रीय सेवा योजना

# प्रतिज्ञापत्र

मी खाली सही करणार की, श्री/श्रीमती/कु. असे नमुद करतो/करते की, मी विद्यापीठाच्या स्पर्धासाठी प्रवेशिका दाखल केली आहे. उपरोक्त प्रवेशिकेमध्ये नमूद केलेली सर्व माहिती सत्य आणि वास्तव्य आहे. अशी मी हमी देत आहे. यामध्ये कोणतीही असत्यता आढळल्यास किंवा सिध्द झाल्यास सदर स्पर्धेसाठी संघ अपात्र ठरविण्यात येईल. याची मला पूर्ण जाणीव आहे.

तसेच पुढे मी असेही नमूद करतो/करते की, उपरोक्त स्पर्धेच्या सर्व नियम व अटी मी वाचलेल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक राहतील. शिवाय राज्य संपर्क अधिकारी / आयोजन समितीने दिलेला निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील. याची देखील मला पूर्ण जाणीव आहे.

सदर स्पर्धेत सहभागी होणारे सर्व १९ स्वयंसेवक हे २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय / विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना एककातील नोंदणीकृत स्वयंसेवक आहेत. सोबत प्रत्येकाचे स्वयंसेवक नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले आहे.

नांव व सही

दिनांक:

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय सेवा योजना कक्ष उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा उत्कर्ष -२०२२-२३ दि.०२ ते ०५ जानेवारी, २०२३

उत्कर्ष प्रत्येक स्पर्धा प्रकारासाठी वेगळी प्रवेशिका वापरावी.

स्पर्धा प्रकार

विद्यापीठाचे नाव

स्पर्धा प्रकाराचे स्वरुप

स्पर्धाकांचा तपशील

| अ.क्र. | स्पर्धकांचे पुर्ण नावं | जन्म तारीख | लिंग | वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |

साथ संगतदार / सहाय्यक तपशील

| अ.क्र. | स्पर्धकांचे पुर्ण नांव | जन्म तारीख | लिंग | वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

असे प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती मी पडताळून पाहिली आहे व सत्य आहे.

तारीख:

संघनायकाची स्वाक्षरी:

संचालक / कार्यक्रम समन्वयक, रासेयो

Certificate of Medical / Physical Fitness- A Specimen

Signature of the Candidate

I do hereby certify that I have examined Mr/Ms ---------------------------------------------

S/o/D/o ----------------------------------------- and found fit for undergoing for Utkarsh२०२२-२३

The candidate whose signature given above is not suffering any communicable or chronic disease, which may cause any hindrance in his/her participation in the above-mentioned programme.

Station:

Dated:

Signature of the Medical Officer
With Registration Number & Seal